प्रेसनोटदिनांक:–०९/१०/२०१९

**शिर्षक** :–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे दाखल असलेल्या सापळा प्रकरणाबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लातूर |
| गुन्हा नोंद कमांक | पो. स्टे.उदगीर शहर, ता.उदगीर जि.लातूर गु.र.नं. २२६/२०१९ |
| क्लम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन–२०१८) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | सचिन शिवाजी माळी वय ३६ वर्षे, पद–सहकारी अधिकारी श्रेणी–१, वर्ग–३, नेमणुक–अवसायक रोहीदास मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, उदगीर तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर. ता.उदगीर , जि.लातूर रा.आयोध्या कॉलनी जुना औसा रोड, लातूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १४,४००/–रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १४,४००/–रूपये लाचेची रक्कम घेण्याचे जाणुनबूजन टाळले आहे. |
| थोडक्यात हकीकत | तक्रारदार यांच्या मयत वडीलांचे नावे असलेली संस्थेची जागा वारसा हक्काने आईच्या नावे हस्तांतरण करण्याच्या कामाचे कागदपत्र दाखल करून नोंद घेण्याच्या कामात मदत करण्यासाठी एक लोकसेवक २५०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्रार दिनांक ०५/१०/२०१९ रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालय येथे प्राप्त झाली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०५/१०/२०१९ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक सचिन शिवाजी माळी यांनी तक्रारदार यांच्या मयत वडीलांच्या नावे असलेली जागा ही वारसा हक्काने त्याच्या आईच्या नावे हस्तांतरण करण्याच्या कामाचे कागदपत्र दाखल करून नोंद घेण्याच्या कामात मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे एकुण शासकीय फी सह २५०००/–रूपयाची मागणी करून त्यामध्ये शासकीय फिस चे १०,६००/–रूपये व्यतिरीक्त अधिकची १४,४००/– रूपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>आरोपी लोकसेवक सचिन माळी यानी तक्रारदार यांना मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी दिनाक ०५/१०/२०१९ व ०९/१०/२०१९ रोजी पाठविले असता त्यांनी लाचेची रक्कम घेण्याचे जाणुनबूजन टाळले आहे. म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन उदगीर शहर गु.र.न २२६/२०१९ कलम ७ ला.प्र.का. १९८८ सह संशोधन अधिनियम २०१८ अन्वये दिनांक ०९/१०/२०१९ रोजी २०.४५ वाजता गून्हा दाखल करण्यात आलेला आहे.<br>पुढील तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत. |
| विशेष बाब ( असल्यास) | आरोपीस अटक नाही. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्यल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग म. राज्याशी संपर्क करावा.

**संपर्काचा पत्ता** :– लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, शिवाजी चौक, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचे पाठीमागे, लातूर

संकेतस्थळ :-acbmaharashtra.gov.in

ई–मेल :–acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार**

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री कं :– १०६४

दुरध्वनी कं :– ०२४८२–२४२६७४

व्हॉटस अप कं. :– ९९३०९९७७००

पोलीस उप-अधिक्षक
अन्टी करप्शन ब्यूरो, लातूर